**ठळक बातम्या**

- पुण्यातल्या २ मेट्रो मार्गिका आणि बदलापूर - कर्जत दरम्यान अतिरीक्त रेल्वे मार्गिकांना केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- आयआयटीच्या नावातून बॉम्बे काढून मुंबई टाकण्यासाठी प्रधानमंत्र्यांना पत्र लिहिण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- शालेय विद्यार्थ्यांसाठी एसटीकडून १८००- २२१- २५१ या हेल्पलाइनची घोषणा

- महानगरपालिका निवडणुकीसाठी अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करायला मुदतवाढ

**आणि**

- देशातल्या दोन्ही शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स १ हजारांनी वाढला, निफ्टी २६ हजारांच्या पलीकडे

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज पुण्यातल्या खडकवासला ते खराडी आणि नळ स्टॉप ते माणिक बागेदरम्यानच्या नव्या मेट्रो मार्गांना मंजुरी दिली. तसंच बदलापूर आणि कर्जत दरम्यानच्या अतिरिक्त रेल्वेमार्गालाही मंजुरी दिली. याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड… मंत्रीमंडळ व्हाइस कास्ट**

*(पुण्यातल्या ४ आणि ४ ए या नव्या मार्गिकांसाठी एकूण ९ हजार ८५८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहेत. खडकवासला ते खराडी मार्गावर २२ तर नळ स्टॉप ते माणिक बागेच्या दरम्यान ६ मेट्रो स्थानकं असतील, अशी माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.*

***होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट***

*येत्या ५ वर्षात हे मार्ग पूर्ण करण्याचं उद्दिष्ट असून त्यानंतर पुण्यातल्या मेट्रो मार्गांची लांबी १०० किलोमीटर पेक्षा जास्त होतील.*

*बदलापूर - कर्जत दरम्यान ६५ किलोमीटरच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गिकेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सव्वा तेराशे कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पाचा निम्मा खर्च राज्य सरकार उचलणार आहे. याशिवाय गुजरातमधल्या ओखा ते कनलस दरम्यानच्या रेल्वे मार्गिकेचं दुहेरीकरण होणार आहे.*

*दुर्मिळ खनिजांपासून चुंबक उत्पादनाच्या योजनेलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. त्यासाठी सव्वा ७ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. यातून वर्षाला ६ हजार मेट्रीक टन दुर्मिळ खनिजांच्या चुंबकांची निर्मिती अपेक्षित आहे. बॅटरीवर चालणारी वाहने, सौर ऊर्जा उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, संरक्षण सामग्रीत हे चुंबक गरजेचे असते, असं वैष्णव म्हणाले.)*

**<><><><><>**

मुंबईतल्या आयआयटीच्या नावातून बॉम्बे हे नाव काढून मुंबई आणावं यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून मागणी करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी आयआयटीच्या नावात बॉम्बे असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं होतं. त्यावरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली होती. याप्रकरणावरुन मुख्यमंत्री बोलत होते.

**<><><><><>**

शालेय विद्यार्थी -विद्यार्थिनींना एसटी बस संदर्भात काही माहिती हवी असेल किंवा काही  समस्या असेल तर एसटीनं त्यांच्यासाठी  हेल्पलाईन सुरू केली आहे. १८००- २२१- २५१ या क्रमांकावर संपर्क साधला तर त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली जावी, तसंच शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामुळे विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान झाल्याची लेखी तक्रार आल्यास जितक्या दिवसाचं  शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित अथवा सक्तीच्या  रजेवर पाठवण्यात यावं,  असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारी इयत्ता पाचवी आणी आठवीसाठीची शिष्यवृत्ती परीक्षेच्या वेत्रापत्रकात बदल करण्यात आला असून ही परीक्षा आता ८ फेब्रुवारी ऐवजी  २२ फेब्रुुवारी २०२६ ला घेण्यात येणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतली जाणारी शिक्षक पात्रता परीक्षी अर्थात सीटीईटी ८ फेब्रुवारी २०२६ ला घेण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी केली होती. त्यानुसार ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

<><><><><>

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करणं, तसंच अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता २७ नोव्हेंबर ऐवजी ३ डिसेंबर झाली आहे, हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याची मुदत ५ डिसेंबर ऐवजी १० डिसेंबर, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करण्याची मुदत ८ डिसेंबर ऐवजी १५ डिसेंबर आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याची मुदत १२ डिसेंबर ऐवजी २२ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

<><><><><>

देशातल्या दोन्ही शेअर बाजारांनी आज जोरदार तेजी नोंदवली. सकाळपासून सुरू झालेली तेजी दिवसअखेरपर्यंत सातत्याने वाढत गेली आणि दोन्ही निर्देशांक वर्षभरातल्या उच्चांकी पातळीजवळ पोहोचले. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार २३ अंकांनी वधारुन ८५ हजार ६१० अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्ये ३२१ अंकांची वाढ झाली आणि हा निर्देशांक २६ हजार २०५ अंकांवर स्थिरावला. अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची आशा, परदेशी गुंतवणुकीतून झालेली वाढ, रशिया आणि युक्रेनमध्ये शस्त्रसंधीची वाढलेली शक्यता या कारणांमुळं शेअर बाजारात एवढी मोठी तेजी झाली.

<><><><><>

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचं प्रतिनिधित्व करणारी भारतीय संसद, आपल्या संविधानकर्त्यांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुत्वाच्या आदर्शांवर पुढे जात आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात झालेल्या मुख्य सोहळ्यात त्या बोलत होत्या.

यावेळी राष्ट्रपतींच्या नेतृत्वाखाली सर्वांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचं वाचन केलं. संविधानाच्या मराठीसह ९ भाषांतल्या अनुवादाचं प्रकाशन यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यसभेतले सभागृह नेते जे. पी. नड्डा, तसंच दोन्ही सभागृहातले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी आणि संसद सदस्य या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

<><><><><>

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याला आज १७ वर्ष पूर्ण झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या हल्ल्यातल्या शहीदांना श्रद्धांजली वाहिली आहे. देशातल्या प्रत्येक नागरिकानं कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाचा विरोध करावा आणि मजबूत तसंच अधिक वैभवशाली भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी वाटचाल करावी, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यातल्या शहीदांना श्रद्धांजली वाहिली आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुंबई हल्ल्यातल्या शहीदांना आणि बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान वीरमरण आलेले अग्निवीर मुरली नाईक यांच्या कुटुंबाला संपूर्ण लाभ नाकारला असल्याचा दावा करत नाईक यांच्या आईनं आज मुंबई उच्च न्यायालयात यासंबंधी याचिका दाखल केली. नियमित जवान आणि अग्निवीर यांच्यात लाभाची रक्कम देताना वेगवेगळे निकष लावले जातात, असं त्यांनी या याचिकेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंढवा इथल्या शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणी अमेडिया एंटरप्रायझेस या कंपनीला आपलं म्हणणं मांडण्यासाठी नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागानं १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. या प्रकरणाची पुढची सुनावणी ४ डिसेंबरला होणार आहे.

**<><><><><>**

२०३० राष्ट्रकुल स्पर्धा गुजरातमध्ये अहमदाबाद इथं होणार आहेत. राष्ट्रकुल संघटनेनं आज ग्लासगो इथं औपचारिकरीत्या आयोजनाचे अधिकार भारताकडे सोपवले.

**<><><><><>**

मुंबईत आज संध्याकाळी हवेचा गुणवत्ता निर्देशांक २२४ इतका नोंदवण्यात आला. हा आकडा अतिशय खराब या श्रेणीत मोडतो. इथियोपियातल्या ज्वालामुखीचा उद्रेक हे यामागचं कारण असू शकतं,

गेल्या २४ तासात राज्यातल्या काही भागात तपमान घसरलं. येत्या १-२ दिवसात राज्यभरात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज आहे. दक्षिणेकडच्या राज्यात वेगवान वारे वाहण्याची शक्यता असल्यानं रविवारपर्यंत खोल समुद्रात मासेमारी टाळावी, असं आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातल्या हातखंबा गावात आज एक टँकर उलटला. अग्निशमन दलाचे बंब, रुग्णवाहिका, आणि  पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि  युद्धपातळीवर प्रयत्न करून  अडीच तासांत वाहतूक पूर्वपदावरआणली.

**//<><><><><>//**